RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १०, अंक ४९(२)] गुरुवार, ऑगस्ट ८, २०२४/श्रावण १७, शके १९४६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ७२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर प्रकटन**

क्रमांक पमपा/नरवि/वि.यो./५०-२४/प्र.क्र. -/ ११० /२०२४

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण**

ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिकेने (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेली) तिच्या नियोजन प्राधिकरण असलेल्या क्षेत्राची (यापुढे "उक्त क्षेत्र" असे उल्लेखलेली) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेली) चे कलम २३(१) व कलम ३८ मधील तरतुदींनुसार सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना (यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे उल्लेखलेली) तयार करणेकामी ठराव क्र. १८९, दि. ०५/०९/२०१९ अन्वये मान्यता देऊन त्याबाबतची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण भाग दोन, असाधारण क्र. ६२, दि. ०९/०९/२०१९ अन्वये इरादा जाहिर केला आहे ;

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून पनवेल महानगरपालिका नियोजन प्राधिकरण असलेल्या क्षेत्रासाठी सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी महानगरपालिकेकडे शासनाकडील प्रतिनियुक्तीवर असलेले सहायक संचालक, नगररचना यांची दि. ०४/१०/२०१९ रोजीच्या आदेशान्वये व तद्नंतर उप संचालक, नगररचना यांची दि.०९/११/२०२३ रोजीच्या आदेशान्वये "नगररचना अधिकारी" म्हणून नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगररचना अधिकारी, सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना, पनवेल महानगरपालिका यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना तयार करून दि.०५/१०/२०२० रोजी पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित केला आहे. तसेच उक्त क्षेत्राची सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना तयार करून ती मा. आयुक्त तथा प्रशासक पनवेल महानगरपालिका यांचेकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी दि. २६/०७/२०२४ रोजी हस्तांतरित केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने म्हणजेच मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना नागरीकांकडून सूचना / हरकती मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यासाठी मा. विशेष सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र. ९४४, दि.०५/०८/२०२४ ने पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये, नागरीकांकडून सूचना/ हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू विकास योजने संबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालील नमूद केलेल्या कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध आहेत;

१. मा. आयुक्त कार्यालय, पनवेल महानगरपालिका, मुख्य इमारत, दुसरा मजला, पनवेल ४१० २०६.

२. मा. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई कक्ष क्र. ३०५, तिसरा मजला, कोकण विभाग, नवी मुंबई ४०० ६१४.

३. सहायक संचालक, नगररचना, रायगड-अलिबाग, जुनी नगरपरिषद इमारत, भाऊसाहेब लेले चौक, अलिबाग ४०२ २०१.

४. नगररचना विभाग, तिसरा मजला, अग्निशमन इमारत, पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६.

सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजनेचे नकाशे व अहवालाच्या प्रती विहित शुल्क आकारून नागरिकांना पनवेल महानगरपालिकेत उपलब्ध होऊ शकतील. तसेच उक्त विकास योजनेचे नकाशे व अहवाल पनवेल महानगरपालिकेच्या *www.panvelcorporation.com* संकेतस्थळावर उपलब्ध राहतील.

सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना / हरकती असतील तर ही सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत आयुक्त, पनवेल महानगरपालिका, आवक / जावक विभाग, पनवेल महानगरपालिका मुख्य इमारत, तळमजला, स्वामी नित्यानंद मार्ग, गोखले हॉल समोर लेखी स्वरूपात कारणांसह सादर करावी. सदरची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत पनवेल महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झालेल्या सूचना / हरकतींवरच केवळ विचार करण्यात येईल.

पनवेल,
दिनांक ८ ऑगस्ट २०२४.

**मंगेश चितळे,**
आयुक्त तथा प्रशासक,
पनवेल महानगरपालिका.

## PANVEL MUNICIPAL CORPORATION

### Notice

No. PMC/TP/D. P/50-24/S. No. --/110/2024.

**Publication of Revised and Comprehensive Draft Development Plan of Panvel Municipal Corporation under section 26(1) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

Whereas, the Panvel Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Planning Authority"), *vide* Resolution No. 189, dated 05/09/2019, has declared its intention to prepare a Revised and Comprehensive Draft Development Plan of Panvel Municipal Corporation (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction where Panvel Municipal Corporation is Planning Authority (hereinafter referred to as "the said area") as per the provisions of Sections 23(1) and 38 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act"), and notice to that effect is published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary Part-II, Extraordinary No.62, Dt. 09/09/2019;

And whereas, as per the provisions of Section 24 of the said Act, the Panvel Municipal Corporation, on dated 04/10/2019, appointed the Assistant Director of Town Planning, and thereafter the Deputy Director of Town Planning, on dated 09/11/2023, as the "Town Planning Officer" to prepare the said Revised and Comprehensive Draft Development Plan for the said area;

And whereas, the Town Planning Officer for the Revised and Comprehensive Draft Development Plan of Panvel Municipal Corporation has submitted the Existing Land Use Map to The Municipal Commissioner of Panvel Municipal Corporation on dated 05/10/2020 as per Section 25 of the said Act, and thereafter prepared and handed over the Revised and Comprehensive Draft Development Plan and it's Report to the Municipal Commissioner and Administrator, Panvel Municipal Corporation of the said area on dated 26/07/2024 for publication under section 26(1) of the said Act;

And whereas, the said Planning Authority, *i.e.*, the Municipal Commissioner and Administrator, has passed Special General Body Administrative Resolution No. 944, dated 05/08/2024 to publish the said Revised and Comprehensive Draft Development Plan of Panvel Municipal Corporation under section 26(1) of the said Act, for inviting suggestions/objections from the public;

Therefore, Panvel Municipal Corporation hereby publishes the said Revised and Comprehensive Draft Development Plan along with its Report under section 26(1) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Revised and Comprehensive Draft Development Plan along with its Report is kept open for inspection by the public at the following offices on all working days during office hours:

1. Office of Hon'ble Commisioner, Panvel Municipal Corporation, Main Building, Second Floor, Panvel 410 206.

2. Hon'ble Joint Director, Town Planning, Konkan Division, Navi Mumbai, 305, 3rd Floor, Konkan Bhavan, Navi Mumbai 400 614.

3. Assistant Director of Town Planning, Raigad-Alibag, Old Municipal Council Building, Bhausaheb Lele Chowk, Alibag 402 201.

4. Town Planning Department, 3rd Floor, Fire Brigade Building, Panvel Municipal Corporation, Panvel 410 206.

The copies of the said Revised and Comprehensive Draft Development Plan along with its Report shall be available to the public at the prescribed price in the office of the Panvel Municipal Corporation. Also, the copies of the said Revised and Comprehensive Draft Development Plan along with its Report shall be available on the website of Panvel Municipal Corporation (*www.panvelcorporation.com*).

Any citizen who wishes to submit any suggestions/objections about the Revised and Comprehensive Draft Development Plan and its Report may submit them in writing to The Municipal Commissioner, Panvel Municipal Corporation, Inward / Outward Department, Panvel Municipal

Corporation Main Building, Ground Floor, Swami Nityananda Road, Opp. Gokhale Marriage Hall, Panvel, within 30 days from the publication of this notice in the *Maharashtra Government Gazette*. It shall be noted that suggestions/objections, if any, received by Panvel Municipal Corporation in writing within 30 days from the date of publication of this notice in the *Maharashtra Government Gazette* shall be considered.

Panvel,
dated 8th August 2024.

MANGESH CHITALE,
Commissioner and Administrator,
Panvel Municipal Corporation.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.